रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

आणि

# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी स्मृती, मुंबई

यांच्या सहयोगाने

# सागरी सुरक्षा विषयक कार्यशाळा

दि. २-३ एप्रिल, २०१६

## -: अहवाल :-

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी मुंबईतील डॉ. शामाप्रसाद मुखर्जी स्मृतीच्या या संस्थेच्या सहयोगाने गेल्या तीन वर्षापासून सुरक्षा विषयक प्रशिक्षण आयोजित करत आहे. यंदा **दि. २-३ एप्रिल, २०१६** रोजी **"सागरी सुरक्षा"** या विषयावर कार्यशाळा योजण्यात आली होती. भारताचा असलेला मोठा सागरी किनारा व सागराशी संबंधित अन्य पैलूंच्या अनुषंगाने असणारे विविध प्रश्न सरकारी क्षेत्रात चर्चिले जातात. सरकाराचे विविध संबंधित विभाग यात सातत्याने काही करतही असतात. मात्र नागरीकांची व सामाजिक घटकांची जबाबदारी देखील यात प्रतिर्बिंबित होणे आवश्यच आहे.




कार्यशाळेचे उद्घाटन
डॉ. प्रभाकरन पालेरी, डॉ. श्रीकांत परांजपे आणि रवींद्र साठे

विशेषत: गेल्या काही वर्षात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर घडणाऱ्या घडामोडी, भारताचा विशाल समुद्रकिनारा भारताचे भौगोलिक स्थान आणि जगभर वेगाने होणाऱ्या प्रगतीमुळे निर्माण झालेली आव्हाने या सर्व बाबींचा विचार करुन नागरी समाजात या विषयाची तोंडओळख होण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. म्हणूनच प्रबोधिनीने सागरी सुरक्षा विषयावर कार्यशाळा योजली होती.




कार्यशाळेत सहभागींना मार्गदर्शन करतांना ब्रिगेडीयर हेमंत महाजन

या अभ्यासक्रमाचे संचालक यशवंतराव चव्हाण विद्यापीठाच्या राष्ट्रीय सुरक्षा विभागाचे संचालक डॉ श्रीकांत परांजपे हे होते. या कार्यशाळेचे उद्घाटन भारतीय तटरक्षक दलाचे माजी महासंचालक डॉ. प्रभाकरन पालेरी यांनी केले. आपल्या विषय मांडणीत त्यांनी समुद्र, समुद्र किनारा, त्याचे विविध पैलू आणि करावयाच्या गोष्टी सहज शब्दात सहभागींसमोर मांडल्या. त्यांचा या विषयातील सखोल अभ्यास सर्व सहभागींना विषय समजून घेण्यासाठी खूप उपयुक्त ठरला.

भारतीय सागरी हद्दीत अनेकजण आपले हितसंबंध जपण्याचा, वा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे हा विषय अभ्यासक्रम संचालक डॉ. श्रीकांत परांजपे यांनी नेमक्या शब्दात मांडला.






सहभागींना प्रमाणपत्र प्रदान करतांना डॉ. श्रीकांत परांजपे

पारंपारिक सुरक्षेपुढील आव्हाने हा विषय दोन सत्रांमधून डॉ. श्रीकांत परांजपे व निवृत ब्रिगेडीयर हेमंत महाजन यांनी मांडला. ब्रिगेडीयर हेमंत महाजन यांनी वर्तमान आव्हाने , वर्तमान सागरी सुरक्षांची स्थिती, भारतीय नक्षल दल, तटरक्षक दल, पोलीस यांची भूमिका, २६/११ पासून मिळालेले बोध या अनुषंगाने विषयाची मांडणी केली. वेगवेगळ्या समाजांची भुमिका मासेमारी, दळणवळण याबाबतच्या आव्हानांच्या स्थितीची मांडणी त्यांनी सहभागींसमोर केली.

कॅप्टन आनंद दिक्षित यांनी अपारंपारीक आव्हानांचा विषय मांडला. त्यांच्या विवेचनात आंतरराष्ट्रीय सामुद्रीक कायदे, ईईझेड, शास्त्रीय संशोधन, वाद विवाद सोडविण्याच्या पध्दती अशा विविध पैलूंचा समावेश होता.

महाराष्ट्राचा विचार करता सागरी सुरक्षा म्हणजे काय? या विषयावर विद्याधर मालेगावकर यांनी तपशीलवार मांडणी केली. क्षेत्रीय पाणी, सुरक्षित किनारा, सामुद्रीक आतंकवाद, अवैध मासेमारी, प्रदुषण, सागरी सीमा विवाद अशा विविध अंगांनी त्यांनी हा विषय सहभागींना समजावून सांगितला. नाविक दलाचे निवृत कमांडर उल्हास गुप्ते यांनी पोलिसदल, नागरीक दल, तटरक्षक दल यांची सागरी सुरक्षेबाबतची भूमिका, त्यांची रचना या विषयाची मांडणी केली.

या कार्यशाळेत एकूण ४० जण (३७ पुरुष व ३ महीला) सहभागी झाले होते. सहभागींनी या कार्यशाळेमुळे खूप मोलाची माहिती मिळाली असा अभिप्राय दिला. तसेच नागरी समाजाचीपण या गंभीर विषयात तितकीच जबाबदारी आहे हे आज आम्हाला समजले ही प्रतिक्रिया दिली.

ही कार्यशाळा सर्व अर्थाने यशस्वी झाली. डॉ. श्रीकांत परांजपे यांनी या कार्यशाळेचा समारोप करताना नागरी व व्यवसायिक जगताची भूमिका काय या विषयावर सहभागींना मार्गदर्शन केले.

सर्व सहभागींना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आली व या कार्यशाळेची समाप्ती झाली.



कार्यशाळेतील सहभागी प्रतिनिधी

**********